# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १९२-२२** **दिनांक :- २५/०६/२०२२**

## जिवे मारण्याच्या उद्देशाने अग्निशस्त्राव्दारे गोळीबार करुन दिड वर्ष फरार असणाऱ्या आरोपीतांना पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-३ विरार यांना यश.

दिनांक १४/०२/२०२१ रोजी रात्री ०९.०० वा.सुमारास साईदया अपार्टमेंट, शॉप नंबर ४, क्यु ॲन्ड क्यु बार समोर, मोरेगाव, नालासोपारा पुर्व येथे अज्ञात आरोपीत यांनी अज्ञात कारणावरुन फिर्यादी बळीराम गुप्ता व साक्षीदार राजकुमार गुप्ता हे त्यांचे शॉपचे समोरील बाकडयावर बसले असतांना पाठीमागील फुटपाथवरुन अज्ञात आरोपीत यांनी पिस्टलने फिर्यादी व साक्षीदार यांचेवर गोळीबार करुन फिर्यादी यांचे डाव्या खांदयाच्या खाली मागील बाजुस व मणक्याच्या डावे बाजुजवळ २ गोळया व साक्षीदार यांचेवर ३ गोळया फायर करुन तसेच कोयत्याने साक्षीदार यांचे डोक्यावर, डावे हातावर, उजवे हातावर जिवघेणे वार करुन फिर्यादी व साक्षीदार यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन तुळींज पोलीस ठाणे गु.र.नं. २२५/२०२१ भा.दं.वि.सं कलम ३०७,३४ सह आर्म ॲक्ट ३ (२५), ४ (२५) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयात तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे आरोपीत निष्पन्न करुन यापुर्वी दोन आरोपीत यांना गुन्हे शाखा कक्ष -३ यांनी ताब्यात घेऊन अटक केली होती. सदर गुन्हयातील गोळीबार करणारे उर्वरीत आरोपीत हे गुन्हा दाखल झाले तारखेपासुन आपले अस्तित्व लपवुन फरार होते. गोपनीय माहिती व तांत्रीक विश्लेषणाव्दारे फरार आरोपीत यांचे उत्तरप्रदेश येथील वास्तव्याबाबत माहिती मिळवुन विशेष कृती दल वाराणसी राज्य उत्तर प्रदेश यांचे मदतीने आरोपीत नामे १) राजकुमार बन्सगोपाल कुशवाह २) धिरज रामाजोर यादव यांचा जौनपुर ते वाराणसी दरम्यान १५ किलोमीटर पाठलाग करुन अत्यंत शिताफीने दिनांक २३/०६/२०२२ रोजी ताब्यात घेण्यात आले तसेच आरोपीत क्रमांक ३) रोशन सुरज मंडलयास वसई येथुन ताब्यात घेण्यात आले आहे.

अधिक तपासा दरम्यान आरोपीत १) राजकुमार बन्सगोपाल कुशवाह २) धिरज रामाजोर यादव यांचा तुळींज पोलीस ठाणे गु.र.नं. १११७/२०२० भा.द.वि.सं. कलम ३२६, ३२४, ५०४ गुन्हयात देखील घटना झाले तारखेपासुन फरार असल्याचे निष्पन्न झाले असुन उक्त आरोपीत यांना पुढील कारवाई करीता तुळींज पोलीस ठाणे येथे वर्ग केले आहे.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, ( मुख्यालय ), अति. कार्यभार (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पो.उप. निरी/ उमेश भागवत, शिवाजी खाडे, पो.हवा/ अशोक पाटील, मनोज चव्हाण, शंकर शिंदे, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.शि/ राकेश पवार, अश्विन पाटील सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

......ooooo.......